# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,पोस्ट बॉक्स नं-२१९,
सामनगांवरोड,नाशिकरोड,नाशिक-४२२१०१
☎(०२५३)२४६१४७९,२४६०११४, फॅक्स:२४५१३०१
e-mail:ronashik.dte@gmail.com Web site : www.dtensk.org


**संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.**

जा.क्र तंशि/विकाना/लले/शिक्षक मान्यता/डीफार्म/२०११/ 1105 दिनांक:- 14 जुलाई JUL 2011

**प्रति,**

प्राचार्य,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित
औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,नाशिक विभाग

**विषय:-संस्थेतील शिक्षकीय पदांची बिंदु नामावली तयार करुन पदे भरणेबाबत.**

**संदर्भ:**-मा.संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेले परिपत्रक क्रमांक मरातंशिमं/का-५०/बिंदूनामावली/२०११/५५०६,दिनांक २३.६.२०११.

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांचे उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. त्यानुसार औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी MSBTE व AICTE / PCI यांच्या मानकानुसार प्राचार्यांचे एक पद, विभागप्रमुखाचे एक पद आणि अधिव्याख्यात्यांची ६ पदे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आलेले असून सदर पदांच्या बिंदू नामावलीस सहाय्यक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) यांचेकडून मान्यता मिळाल्यानंतर पदे भरण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. तसेच वरील संदर्भिय पत्रात नमूद अटींचे संस्थेतील शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करतांना कटाक्षाने पालन करण्याबाबत नमूद केलेले आहे.

तरी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकातील सूचना व अटींचे संस्थेतील शिक्षकीय पदे भरण्याबाबतची कार्यवाही करतांना कटाक्षाने पालन करण्यात यावे.

( दि.रा.नंदनवार )
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक.

प्रत-मा.संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मंबई-४०० ०५१ यांना माहितीसाठी सादर.

**प्रत-प्रोग्रामर,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक.**
२/ त्यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त)) (ISO 9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.) / २६४७०९१६ (वै.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/बिंदूनामावली/२०११/ ९००६ दिनांक - 23 JUN 2011

**Web Circular**

प्रति,
मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था

**विषय: संस्थेतील शिक्षकीय पदांची बिंदूनामावली तयार करुन पदे भरणेबाबत**

संदर्भ: शा.नि., सा.प्र.वि., शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६- ब, दि. ५/११/२००९

औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या आणि मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी MSBTE व AICTE / PCI यांच्या मानकानुसार **प्राचार्याचे एक पद, विभागप्रमुखाचे एक पद आणि अधिव्याख्यात्यांची** ६ पदे आवश्यक असून सदर पदांची बिंदूनामावली तयार करुन बिंदूनामावलीस सहाय्यक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) यांचेकडून मान्यता मिळाल्यानंतर पदे भरण्याबाबतची कार्यवाही करावी.

**शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करतांना खालील अटींचे कटाक्षाने पालन करावे :-**

- *सहाय्यक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) यांनी मान्यता दिलेल्या बिंदूनामावलीप्रमाणे पदे भरण्यात यावीत. त्यांनी दर्शविलेला मागासवर्गीयांचा सर्व अनुशेष (Backlog) प्रथम भरणे आवश्यक आहे.*
- *पदे भरण्यासाठीची जाहिरात विहित नमुन्यात कमीत कमी दोन राज्यस्तरीय अग्रगण्य वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. (एक इंग्रजी वर्तमानपत्र असावे.)*
- *जाहिरातीनुसार आलेल्या अर्जांची पदनिहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी.*
- *सदर पदांच्या निवडीसाठी Selection Committee ची स्थापना करावी. Selection Committee मध्ये DTE, MSBTE प्रतिनिधी, मागासवर्गीय प्रतिनिधी, Subject Expert यांचा समावेश असावा.*
- *AICTE/PCI आणि MSBTE च्या मानका व प्रमाणकानुसार पदे भरण्यात यावीत.*
- *निवड प्रक्रीया ही संपूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तेनुसार पार पाडण्यात यावी.*
- *मुलाखतीस हजर राहणाऱ्या उमेदवारांचे पदांनुसार Attendance तयार करण्यात यावे.*
- ***मंडळाने तयार केलेल्या Faculty Approval Process Manual मध्ये नमूद करण्यात आलेल्या पध्दतीचा काटेकोरपणे अवलंब करण्यात यावा.***

(डॉ.पी.एम.खोडके)
संचालक,म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी रवाना
१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
२) उपसचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे/औरंगाबाद/नागपूर आणि प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग.